## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ मे २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टीपीएस-१२२६/४६८/सीआर-५१/२६/खारबांव/नवि-१२.—ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाने, अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२१८/१६६५/ सीआर ७९/२०/नवि -१२, दिनांक २० एप्रिल, २०२१ अन्वये मुंबई महानगर प्रदेशाकरिता सुधारित प्रादेशिक योजना (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्रादेशिक योजना " असा करण्यात आला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम १५(१) च्या तरतुदींनुसार मंजूर केली असून ती दिनांक २० जून २०२१ पासून अंमलात आली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने, अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२०६/३३०/सीआर-२३०/०६/ नवि-१२, दिनांक १७ मार्च, २००७ (महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १९ एप्रिल, २००७ रोजी प्रसिद्ध) द्वारे, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(क) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये स्थापित मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) यांची, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील ५१ गावांचा (सुधारित ६० गावे) समावेश असलेल्या भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विशेष नियोजन प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) म्हणून नियुक्ती केली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचित क्षेत्र "असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विनंतीचा विचार करून आणि माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ मार्च, २०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांनुसार, शासनाच्या नगरविकास विभागाने, अधिसूचना क्रमांक टीपीबी-४३२१/सीआर-१३०/२०२१/नवि-११, दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ आणि दिनांक ३ डिसेंबर, २०२५ च्या शुद्धिपत्रकाद्वारे, ता. भिवंडी येथील खारबांव (CT), मालोडी, पाये, पायगाव, खार्डी, पालिवली, फिरंगपाडा, गाणे, ब्राम्हणगाव आणि वसई तालुक्यातील नागले या १० गावांचे सुमारे ५८.५२ चौ.कि.मी. क्षेत्र 'खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क अधिसूचित क्षेत्र' म्हणून अधिसूचित केले असून, उक्त अधिनियमाच्या कलम ४०(१)(क) नुसार उक्त क्षेत्रासाठी सदर प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, माननीय उपमुख्यमंत्री (नगरविकास), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांनुसार आणि उक्त प्राधिकरणाने दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजीच्या पत्राद्वारे शासनाच्या नगरविकास विभागास, लगतच्या एकूण ३४ महसुली गावांचा (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त गावे " असा करण्यात आला आहे) 'खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क अधिसूचित क्षेत्रात' समावेश करून त्यासाठी प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याची विनंती केलेली आहे, ज्यामधे प्रादेशिक योजनेतील भिवंडी तालुक्यातील ६ महसुली गावांचे सुमारे ४४.१७ चौ.कि.मी. क्षेत्र आणि भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातील २८ गावांचे सुमारे ७३.४४ चौ.कि.मी. या क्षेत्राचा समावेश आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त क्षेत्र " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाच्या विनंतीचा विचार करून, माननीय उपमुख्यमंत्री (नगरविकास), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उक्त बैठकीतील निर्णयांनुसार आणि संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर, शासनाचे असे मत झाले आहे की, उक्त क्षेत्राच्या सुनियोजित विकासाच्या दृष्टिकोनातून, दिनांक २५ सेप्टेंबर, २०२५ ची अधिसूचना आणि दिनांक ३ डिसेंबर, २०२५ च्या शुद्धिपत्रकाद्वारे अधिसूचित क्षेत्रासह उक्त क्षेत्र 'खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क अधिसूचित क्षेत्र' म्हणून अधिसूचित करणे आणि उक्त क्षेत्रासाठी उक्त प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी, आता शासन याद्वारे,—**

(अ) उक्त अधिनियमाच्या कलम १६० व त्याअनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या अधिकारांन्वये या अधिसूचने सोबत जोडलेल्या **'परिशिष्ट-अ'** मध्ये नमूद केल्याप्रमाणे भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातील २८ गावे भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात येत आहे.

(ब) उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (क) मधील तरतुदीनुसार शासनास प्राप्त असलेल्या व इतर सर्व अधिकारांचा वापर करून, दिनांक २५ सेप्टेंबर, २०२५ च्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित क्षेत्रासह 'खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क' चे क्षेत्र नकाशावर दर्शविल्याप्रमाणे व **'परिशिष्ट-ब'** मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करण्यात येत आहे आणि भिवंडी तालुक्यातील एकूण ३४ महसुली गावांच्या अतिरिक्त क्षेत्रासाठी, अशा एकूण ४४ महसुली गावांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

(क) सदर अधिसूचनेपूर्वी उक्त क्षेत्रामध्ये इतर कोणतेही नियोजन प्राधिकरण कार्यरत असल्यास, त्या कार्यरत असलेल्या नियोजन प्राधिकरणाचे कार्य महाराष्ट्र शासन राजपत्रात ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून संपुष्टात येतील.

(ड) उक्त अधिनियमात नमूद केल्यानुसारची कार्यपद्धती अवलंबून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) अधिसूचित क्षेत्रासाठी विकास योजना प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली तयार करून प्रसिद्ध करावी आणि ती अधिनियमातील तरतुदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास मंजूरीकरिता सादर करावी, असे शासन निदेश देत आहे.

(इ) घोषित करित आहे की, अधिसूचित क्षेत्राची प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) नुसार प्रसिद्ध होईपर्यंत मंजूर प्रादेशिक योजनेतील प्रस्ताव व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर प्रादेशिक योजनेच्या ६ अधिसूचित महसुली गावांकरिता लागू राहतील.

(फ) घोषित करित आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये विकास आराखडा प्रसिद्ध होईपर्यंत भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातील २८ अधिसूचित महसूली गावांकरिताचा मंजूर विकास आराखडा प्रस्ताव आणि एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू राहतील.

ग. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक, सदर अधिसूचना अमलात आल्याचा दिनांक राहील.

२. सदर अधिसूचना व त्यासोबतचे '**परिशिष्ट-अ**', '**परिशिष्ट-ब**' आणि अधिसूचित क्षेत्राची हद्द दर्शवणारा नकाशा खलील नमूद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहीलः

(*i*) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

(*ii*) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(*iii*) जिल्हाधिकारी, ठाणे.

(*iv*) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

## परिशिष्ट -अ

## (भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या २८ गावांची यादी)

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या गावांची नावे |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ठाणे | भिवंडी | दिवे |
| २ | ठाणे | भिवंडी | केवणी |
| ३ | ठाणे | भिवंडी | राहणाळ |
| ४ | ठाणे | भिवंडी | डुंगे |
| ५ | ठाणे | भिवंडी | कालवार |
| ६ | ठाणे | भिवंडी | वडघर |
| ७ | ठाणे | भिवंडी | वडूनवघर |
| ८ | ठाणे | भिवंडी | कारिवली |
| ९ | ठाणे | भिवंडी | टेंभवली |
| १० | ठाणे | भिवंडी | जुनादुर्खी |
| ११ | ठाणे | भिवंडी | शिवाजीनगर |
| १२ | ठाणे | भिवंडी | कांबे |
| १३ | ठाणे | भिवंडी | दह्याळ |
| १४ | ठाणे | भिवंडी | खोणी |
| १५ | ठाणे | भिवंडी | काटई |
| १६ | ठाणे | भिवंडी | बोरपाडा |
| १७ | ठाणे | भिवंडी | वाघीवली |
| १८ | ठाणे | भिवंडी | कोल्हीवली |
| १९ | ठाणे | भिवंडी | शेलार |
| २० | ठाणे | भिवंडी | सावंधे |
| २१ | ठाणे | भिवंडी | गोरसई |
| २२ | ठाणे | भिवंडी | कवाडखुर्द |
| २३ | ठाणे | भिवंडी | सोनटक्का |
| २४ | ठाणे | भिवंडी | भिनार |
| २५ | ठाणे | भिवंडी | निंबवली |
| २६ | ठाणे | भिवंडी | काशीवली |
| २७ | ठाणे | भिवंडी | धामणगाव |
| २८ | ठाणे | भिवंडी | वडरे |

## परिशिष्ट -ब

## (खारबांव इन्टीग्रेटड बिझनेस पार्क अधिसूचित क्षेत्रात समाविष्ट गावांची यादी)

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | दिनांक २५ सप्टेंबर २०२५ च्या अधिसूचनेनुसार अधिसूचित गावांची नांवे | तालुका | खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्कमध्ये दिनांक १९ मे २०२६ च्या अधिसूचनेनुसार समाविष्ट गावांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ठाणे | भिवंडी | खारबांव | भिंवडी | कुहे |
| २ | ठाणे | भिवंडी | मालोडी | भिंवडी | धामणे |
| ३ | ठाणे | भिवंडी | पाये | भिंवडी | लाखिवली |
| ४ | ठाणे | भिवंडी | पायेगाव | भिंवडी | आलखिवली |
| ५ | ठाणे | भिवंडी | खार्डी | भिंवडी | चिंबीपाडा |
| ६ | ठाणे | भिवंडी | पालीवली | भिंवडी | पिळंझेखुर्द |
| ७ | ठाणे | भिवंडी | फिरंगपाडा | भिंवडी | दिवे |
| ८ | ठाणे | भिवंडी | गाणे | भिंवडी | केवणी |
| ९ | ठाणे | भिवंडी | ब्राम्हणगाव | भिंवडी | राहणाळ |
| १० | पालघर | वसई | नागले (ता. वसई) | भिंवडी | डुंगे |
| ११ | --- | --- | --- | भिंवडी | कालवार |
| १२ | --- | --- | --- | भिंवडी | वडघर |
| १३ | --- | --- | --- | भिंवडी | वडुनवघर |
| १४ | --- | --- | --- | भिंवडी | कारिवली |
| १५ | --- | --- | --- | भिंवडी | टेंभवली |
| १६ | --- | --- | --- | भिंवडी | जुनादुर्खी |
| १७ | --- | --- | --- | भिंवडी | शिवाजीनगर |
| १८ | --- | --- | --- | भिंवडी | कांबे |
| १९ | --- | --- | --- | भिंवडी | दह्याळ |
| २० | --- | --- | --- | भिंवडी | कोणी |
| २१ | --- | --- | --- | भिंवडी | काटई |
| २२ | --- | --- | --- | भिंवडी | बोरपाडा |
| २३ | --- | --- | --- | भिंवडी | वाघीवली |
| २४ | --- | --- | --- | भिंवडी | कोल्हीवली |
| २५ | --- | --- | --- | भिंवडी | शेलार |
| २६ | --- | --- | --- | भिंवडी | सावंधे |
| २७ | --- | --- | --- | भिंवडी | गोरसई |
| २८ | --- | --- | --- | भिंवडी | कवाडखुर्द |
| २९ | --- | --- | --- | भिंवडी | सोनटक्का |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | दिनांक २५ सप्टेंबर २०२५ च्या अधिसूचनेनुसार अधिसूचित गावांची नांवे | तालुका | खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्कमध्ये दिनांक १९ मे २०२६ च्या अधिसूचनेनुसार समाविष्ट गावांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ३० | --- | --- | --- | भिंवडी | भिनार |
| ३१ | --- | --- | --- | भिंवडी | निंबवली |
| ३२ | --- | --- | --- | भिंवडी | काशीवली |
| ३३ | --- | ---- | --- | भिंवडी | धामणगाव |
| ३४ | --- | --- | --- | भिंवडी | वडपे |

३. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* (Acts/Rules) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**निर्मलकुमार चौधरी,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 19th May 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No.TPS-1226/468/CR-51/26/Kharbav/UD-12.—Whereas, the Government in Urban Development Department has sanctioned the Revised Regional Plan for the Mumbai Metropolitan Region (hereinafter referred to as " the said Regional Plan ") *vide* Notification No.TPS-1218/1665/C.R.79/20/ UD-12, dated the 20th April, 2021 (hereinafter referred to as "the said Notification") as per the provisions of Section 15(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") which has come into force with effect from 20th June, 2021 ;

Whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* its Notification No.TPS-1206/330/ CR-230/06/UD-12, dated the 17th March 2007 (Published in *Government Gazette* on 19th April, 2007) promulgated in exercise of its powers conferred by clause (c) under sub-section (1) of section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") appointed Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as " the said Authority ") established under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974, to be the Special Planning Authority (hereinafter referred to as " the said Special Planning Authority ") for Bhiwandi Surrounding Notified Area, which includes the area of 51 villages (revised 60 villages) from Bhiwandi Tahsil of Thane District (hereinafter referred to as " the said Notified Area ") ;

And whereas, considering the request of Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as 'the said Authority') and decisions taken in the meeting held on 18/3/2021 under chairmanship of Hon'ble Chief Minister of Maharashtra, the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPB-4321/CR-130/2021/UD-11 dated 25th September, 2025 and Corrigendum dated 3rd Devember 2025 has notified an area admeasuring about 58.52 Sq. km. of 10 villages namely Kharbav (CT), Malodi, Paye, Paygaon, Khardi, Palivali, Phirangpada, Gane, Bramhangaon, Tal. Bhiwandi and Village Nagale, Tal. Vasai, as 'Kharbav Integrated Business Park Notified area' and appointed the said Authority as Special Planning Authority as per sub-section (1)(c) of Section 40 of the said Act for the said Area ;

And whereas, as per the decisions taken in the meeting held on 16th February 2026 under the chairmanship of the Hon'ble Deputy Chief Minister (Urban Development) of Maharashtra and the request made by the said Authority *vide* letter dated 24th April 2026 to the Government in Urban Development Department to include additional area of total 34 adjoining revenue villages (hereinafter referred to as 'the said villages') in the 'Kharbav Integrated Business Park Notified area' namely area of 6 revenue villages from the Bhiwandi Tahsil of the said Regional Plan admeasuring about 44.17 sq.km. and 28 villages from the Bhiwandi Surrounding Notified Area admeasuring about 73.44 sq. km. (hereinafter referred to as 'the said area') and to appoint the said Authority as Special Planning Authority ;

And whereas, considering the request of the said Authority and decisions taken in the abovesaid meeting held under chairmanship of Hon'ble Deputy Chief Minister (Urban Development) of Maharashtra and also after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that in view of the envisaged development of the said area, it is

necessary to notify the said area of the said villages including the area notified *vide* notification dated 25th September 2025 and Corrigendum dated 3/12/2025, as 'Kharbav Integrated Business Park Notified area' and declare the said area as ' Notified area' and to appoint the said Authority as Special Planning Authority for the said area ;

**Now, therefore, the Government hereby :—**

(A) In exercise of the powers conferred under section 160 of the said Act and all other powers enabling it in this behalf, 28 villages from the Bhiwandi Surrounding Notified Area, more specifically mentioned in the Schedule-A appended hereto, are denofied from the Bhiwandi Surrounding Notified Area.

(B) In exercise of the powers conferred under Sub-section (1)(c) of section 40 of the said Act, and all other powers enabling it in this behalf, notifies the area as 'Kharbav Integrated Business Park' including the area notified *vide* notification dated 25th September 2025 as shown on plan and appoints the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) as Special Planning Authority for the additional area of 34 revenue villages from Bhiwandi Tahsil, total 44 revenue villages, more specifically mentioned in the Schedule-B appended hereto.

(C) Declares that any other Planning Authority functioning in the aforesaid area prior to this Notification shall cease to function from the date of publication of this Notification in the *Maharashtra Government Gazettee.*

(D) Directs the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) to prepare and publish the development proposals and development control regulations for the said notified area and submit the same to the Government for sanction after following due procedure prescribed in the said Act.

(E) Declares that the sanctioned Regional Plan proposals and the Unified Development Control and Promotion Regulation for the 6 notified revenue vllages of the sanctioned Regional Plan shall be applicable till the publication of the Development Plan under section 26(1) of the said Act,.

(F) Declares that the sanctioned Development Plan proposals of Bhiwandi Surrounding Notified Area and the Unified Development Control and Promotion Regulation for the 28 notified revenue villages of the sanctioned Development Plan shall be applicable till the publication of the Development Plan under section 26(1) of the said Act,.

(G) Fixes the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazzette* as the date of coming into force of this notification.

2. The notification along with the Schedule-A & Schedule-B and the copy of the plan showing the boundaries of the said notified area shall be available for inspection for the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month.

(*i*) Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority, MMRDA, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai- 51.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Collector, Thane

(*iv*) The Asssistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

*Schedule-A*

**(List of villges deleted from the Bhiwandi Surrounding Notified Area)**

| **Sr. No.** | **District** | **Taluka** | **Name of villages deleted from the Bhiwandi Surrounding Notified Area.** |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Thane | Bhiwandi | Dive |
| 2 | Thane | Bhiwandi | Kevani |
| 3 | Thane | Bhiwandi | Rahanal |
| 4 | Thane | Bhiwandi | Dunge |
| 5 | Thane | Bhiwandi | Kalwar |
| 6 | Thane | Bhiwandi | Vadghar |
| 7 | Thane | Bhiwandi | Vadunavghar |
| 8 | Thane | Bhiwandi | Karivali |
| 9 | Thane | Bhiwandi | Tembhvali |
| 10 | Thane | Bhiwandi | Junadurkhi |
| 11 | Thane | Bhiwandi | Shivajinagar |
| 12 | Thane | Bhiwandi | Kambe |
| 13 | Thane | Bhiwandi | Dahyale |
| 14 | Thane | Bhiwandi | Khoni |
| 15 | Thane | Bhiwandi | Katai |
| 16 | Thane | Bhiwandi | Borpada |
| 17 | Thane | Bhiwandi | Waghivali |
| 18 | Thane | Bhiwandi | Kolhivali |
| 19 | Thane | Bhiwandi | Shelar |
| 20 | Thane | Bhiwandi | Savandhe |
| 21 | Thane | Bhiwandi | Gorasai |
| 22 | Thane | Bhiwandi | Kawadakhurd |
| 23 | Thane | Bhiwandi | Sonatakka |
| 24 | Thane | Bhiwandi | Bhinar |
| 25 | Thane | Bhiwandi | Nimbavali |
| 26 | Thane | Bhiwandi | Kashivali |
| 27 | Thane | Bhiwandi | Dhamangaon |
| 28 | Thane | Bhiwandi | Vadpe |

*Schedule-B*

**(List of villges deleted from the Karbav Integrated Business Park Notified Area)**

| **Sr. No.** | **District** | **Taluka** | **Name of villages notifed *vide* Notification dated 25th September 2025** | **Taluka** | **Name of villages included in these notified area *vide* notification dated 19th May 2026 of the Kharbav Integrated Business Park** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Thane | Bhiwandi | Kharbav (CT) | Bhiwandi | Kuhe |
| 2 | Thane | Bhiwandi | Malodi | Bhiwandi | Dhamane |
| 3 | Thane | Bhiwandi | Paye | Bhiwandi | Lakhivali |
| 4 | Thane | Bhiwandi | Paygaon | Bhiwandi | Alakhivali |
| 5 | Thane | Bhiwandi | Khardi | Bhiwandi | Chimbipada |
| 6 | Thane | Bhiwandi | Palivali | Bhiwandi | Pilanzhe Khurd |
| 7 | Thane | Bhiwandi | Phirangpada | Bhiwandi | Dive |
| 8 | Thane | Bhiwandi | Gane | Bhiwandi | Kevani |
| 9 | Thane | Bhiwandi | Bramhangaon | Bhiwandi | Rahanal |
| 10 | Palghar | Vasai | Nagale | Bhiwandi | Dunge |
| 11 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Kalwar |
| 12 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Vadghar |
| 13 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Vadunavghar |
| 14 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Karivali |
| 15 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Tembhvali |
| 16 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Junadurkhi |
| 17 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Shivajinagar |
| 18 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Kambe |
| 19 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Dahyale |
| 20 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Khoni |
| 21 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Katai |
| 22 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Borpada |
| 23 | - - - | | - - - | Bhiwandi | Waghivali |
| 24 | - - - | - - - | - - - | Bhiwandi | Kolhivali |

| **Sr. No.** | **District** | **Taluka** | **Name of villages notifed *vide* Notification dated 25th September 2025** | **Taluka** | **Name of villages included in these notified area *vide* notification dated 19th May 2026 of the Kharbav Integrated Business Park** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 25 | – – – | - - - | - - - | - - - | Shelar |
| 26 | – – – | - - - | - - - | - - - | Savandhe |
| 27 | – – – | - - - | - - - | - - - | Gorasai |
| 28 | – – – | - - - | - - - | - - - | Kawadakhurd |
| 29 | – – – | - - - | - - - | - - - | Sonatakka |
| 30 | – – – | - - - | - - - | - - - | Bhinar |
| 31 | – – – | - - - | - - - | | Nimbavali |
| 32 | – – – | - - - | - - - | - - - | Kashivali |
| 33 | – – – | - - - | - - - | - - - | Dhamangaon |
| 34 | – – – | - - - | - - - | - - - | Vadpe |

3. This Notification shall also be available on the Govt. of Maharashtra website : *www.maharashtra.gov.in* ( Acts/Rules ).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NIRMALKUMAR CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.